# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक : 27.03.2024** **वार-गुरुवार**

---

1.लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपली;

2.दुसऱ्या टप्प्याच्या प्रक्रियेचा आजपासून आरंभ

3.सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हळदीला उच्चांकी 70 हजार रुपये प्रतिक्विंटल भाव

4.राष्ट्रीय तपास संस्थेच्या महासंचालकपदी सदानंद दाते यांची नियुक्ती आणि

5.राज्यात बहुतांश ठिकाणी तापमान ४० अंशांच्या पुढे

**<u>निवडणूक मुंबईमाधुरी</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात १७ राज्यं आणि ४ केंद्रशासित प्रदेशांमधल्या १०२ जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत काल संपली. महाराष्ट्रातल्या नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि गडचिरोली-चिमूर या पाच लोकसभा मतदारसंघांचा यात समावेश आहे. याठिकाणी १९ एप्रिलला  मतदान होणार आहे. उमेदवारी अर्जांची आज छाननी करण्यात येईल, तर ३० मार्च ही उमेदवारी अर्ज मागं घेण्याची शेवटची तारीख आहे.

नागपूर लोकसभा मतदार संघातून भाजपा तसंच महायुतीचे उमेदवार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तर, रामटेक लोकसभा मतदारसंघातून शिवसेना आणि महायुतीचे उमेदवार राजू पारवे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी उपस्थित होते. भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघात भाजपचे उमेदवार सुनील मेंढे यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला.

**<u>महाविकास आघाडी</u>**

कॉंग्रेसच्या वतीनं भंडारा गोंदिया मतदार संघात डॉक्टर प्रशांत पडोळे यांनी अर्ज दाखल केला. या वेळी कॉंग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या सह महाविकास आघाडीचे अनेक नेते ,माजी मंत्री आणि आमदारांसह हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. रामटेक लोकसभा मतदारसंघातून कॉंग्रेसकडून रश्मी बर्वे यांनी अर्ज दाखल केला. गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.नामदेव किरसान यांनी काल शक्तीप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

**<u>सार्वत्रिक निवडणूक दुसरा टप्पा</u>**

सार्वत्रिक निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी आजपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. या टप्प्यात १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातील ८९ मतदारसंघांमध्ये २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात आसाम, बिहार, छत्तीसगड, जम्मू आणि काश्मीर,कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, राजस्थान, त्रिपुरा, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल, महाराष्ट्र या राज्यं आणि केंद्र शासित प्रदेशांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील हिंगोली, नांदेड, परभणी, बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा आणि यवतमाळ-वाशिम या मतदारसंघांमध्ये दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे.

**<u>शिवसेना उबाठा</u>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं काल १७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. पक्षासोबत असलेल्या जुन्या खासदारांना, तसंच गेल्यावेळी पराभूत झालेल्या उमेदवारांना पक्षानं पुन्हा संधी दिली आहे. दक्षिण मुंबईतून अरविंद सावंत, ठाण्यातून राजन विचारे, रत्नागिरी-सिंधुदुर्गमधून विनायक राऊत, उस्मानाबाद मधून ओमराजे निंबाळकर आणि परभणीतून संजय जाधव पुन्हा पक्षाचे उमेदवार असतील. गेल्यावेळी पराभूत झालेल्या चंद्रकांत खैरे यांना औरंगाबादमधून, संजय दिना पाटील यांना ईशान्य मुंबईतून आणि अनंत गीते यांना रायगडमधून पक्षानं पुन्हा संधी दिली आहे . वायव्य मुंबई मतदारसंघातून अमोल किर्तीकर यांना पक्षानं तिकीट दिलं आहे. दक्षिण मध्य मुंबईतून अनिल देसाई, नाशिक- राजाभाऊ वाजे, बुलढाणा- नरेंद्र खेडेकर, हिंगोली- नागेश पाटील-आष्टीकर, शिर्डी- भाऊसाहेब वाकचौरे, यवतमाळ-वाशिम- संजय देशमुख, सांगली- चंद्रहार पाटील आणि मावळमधून संजोग वाघेरे-पाटील हे पक्षाचे उमेदवार असतील. दरम्यान, भाजपातर्फे काल जाहीर यादीमध्ये अमरावती लोकसभा मतदारसंघातून खासदार नवनीत राणा भाजपच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढवणार आहेत.

**<u>वंचित बहुजन आघाडी</u>**

वंचित बहुजन आघाडीनं लोकसभा निवडणूकीत ओबीसी महासंघाशी युती करणार असल्याचं जाहीर केलं आहे. पक्षाचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत आपल्या ८ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली.

अकोल्यातून प्रकाश आंबेडकर स्वत: निवडणूक लढवणार असून, नागपूर मतदार संघात काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा देणार असल्याचं आंबेडकर यांनी सांगितलं.

या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.....

**हळद**

सांगली कृषी उत्पन्न समितीमध्ये मंगळवारी काढण्यात आलेल्या सौद्यामध्ये हळदीला 70 हजार रुपये प्रतिक्विंटल उच्चांकी भाव मिळाला. रायबाग तालुक्यातील मलिकार्जुन तेली या शेतकऱ्याच्या राजापुरी हळदीला हा दर मिळाला. बाजार समितीचे अध्यक्ष सुजय शिंदे यांनी आकाशवाणीला याबाबत अधिक माहिती दिली...

फळबागपुणे जिल्हयात वर्तमान आर्थिक वर्षात दोन हजार २७६ हेक्टरवर नव्यानं फळबागांची लागवड करण्यात आली आहे. पावसाचं प्रमाण कमी असूनही योजनेला शेतक-यांचा चांगला प्रतिसाद  मिळाला असल्याची  माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली.

**स्वच्छता उपक्रम**

रायगड जिल्ह्यातल्या माथेरान या पर्यटनस्थळी स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी नगरपरिषदेनं एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. ऐकूया याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**स्क्रिप्ट**

माथेरान पर्यटनस्थळी स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी निर्जीव भिंतींवर स्वच्छतेविषयी चित्र रेखाटून आणि सुविचाराने भिंती बोलक्या केल्या जात आहेत. माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेने हा उपक्रम सुरू करून स्थानिकांना तसेच येणाऱ्या पर्यटकांना स्वच्छतेचा संदेश दिला आहे. माथेरानमध्ये वाहनांना बंदी असल्याने स्वच्छता करण्यासाठी मनुष्यबळाचा वापर केला जातो. एकूण 54 किलोमीटरच्या परिघामध्ये मनुष्यबळावर स्वच्छता करणे शक्य नसल्याने नगरपालिकेकडून भिंतीत चित्र रेखाटून स्वच्छतेविषयी जनजागृती केली जात आहे. वीर हुतात्मा भाई कोतवाल विद्यामंदिर, उद्याने, घरांच्या भिंती, दुकानाच्या भिंतीवर वेगवेगळ्या प्रकारे चित्र रेखाटून निसर्ग आपला सोबती असल्याचे सुविचार लिहून जनजागृतीकेली जाते आहे..

**नियुक्ती**

भारतीय पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी सदानंद दाते यांची NIA अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेच्या महासंचालकपदी नियुक्ती झाली आहे. ते १९९० च्या तुकडीचे भारतीय पोलीस सेवेतले अधिकारी असून, सध्या महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख म्हणून काम पाहत आहेत. मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीनं दाते यांच्या नियुक्तीला ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत अर्थात त्यांच्या सेवानिवृत्तीपर्यंतच्या कार्यकाळापर्यंत मान्यता दिल्याचं कार्मिक मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**<u>हरकती</u>**

उरण इथल्या अटल सेतू परिसरात राज्य शासनानं एमएमआरडीएच्या माध्यमातून नवनगर प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी सिडकोच्या खोपटा प्रकल्पातील ३२ आणि नैना क्षेत्राच्या दुसऱ्या टप्प्यातील ८० गावांचा समावेश केला जाणार आहे. या प्रकल्पासाठी 3 एप्रिलपर्यंत सूचना आणि हरकती नोंदवल्या जाणार आहेत. या नवनगर प्रकल्पाला स्थानिक ग्रामस्थांनी विरोध केला आहे. सीबीडी बेलापूर इथल्या सहसंचालक नगररचना कार्यालयात ग्रामस्थांनी काल हरकती सादर केल्या. यावेळी मोठ्या संख्येनं ग्रामस्थ उपस्थित होते.

**<u>कारवाई</u>**

साताऱ्याजवळील खेडमधल्या प्रतापसिंह नगरात राहणारा सराईत गुन्हेगार दत्ता जाधव याच्या  3 मजली इमारतीसह इतर 16 अनधिकृत बांधकामं काल जिल्हा प्रशासनानं पोलीस बंदोबस्तात जमीनदोस्त केली. कारवाई दरम्यान प्रतापसिंह नगरला जोडणारे सर्व रस्ते पोलिसांनी बंद ठेवले होते.  दत्ता जाधव सध्या संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत कारागृहात आहे.

**<u>लाच</u>**

लाचेची मागणी करणाऱ्या अटकेतील आरोपीला लाच स्विकारण्याच्या अपराधास प्रोत्साहन दिल्याचं निष्पन्न झाल्यानं नंदूरबार जिल्ह्यातील नवापूर तहसीलदारांसह नायब तहसिलदार यांना नंदुरबार लाच लुचपत प्रतिबंधक विभागानं अटक केली आहे. नवापूर तालुक्यातील एका व्यक्तिला विभागानं गेल्या वर्षी  21 नोव्हेंबरला लाच घेतांना अटक करून नवापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. १३ जणांविरुद्धची प्रतिबंधक कारवाई तहसील कार्यालय नवापूर इथल्या साहेबांना सांगून बंद करून देण्याच्या मोबदल्यात लाच घेतल्या प्रकरणी ही कारवाई करण्यात आली होती. याच गुन्ह्याच्या सखोल तपासात तहसिलदार आणि नायब तहसिलदार आणि एका कर्मचाऱ्याचा सहभाग दिसून आल्यानं  त्यांना अटक करण्यात आली.

**तुकाराम बीज**

तुकाराम बीजेचा सोहोळा काल सर्वत्र भक्तिभावानं साजरा करण्यात आला. संत तुकाराम महाराजांच्या त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी बीज यात्रेनिमित्त पुणे जिल्ह्यातल्या देहू इथं श्री संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीनं काकड आरती, श्रींची महापूजा आणि श्री संत तुकाराम महाराज शिळा मंदिर पूजा आदी कार्यक्रम घेण्यात आले. बीजेनिमित्त मंदिराला रोषणाई करण्यात आली आहे.

**अंबाजोगाई**

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई शहराला पाणी पुरवठा धनेगावच्या मांजरा धरणातून करण्यात येणारा पाणी पुरवठा मागील कित्येक वर्षापासून नगर पालिकेकडे पाटबंधारे विभागाची पाच कोटी ७१ लाख रूपयांची थकबाकी असल्यामुळे मंगळवारी बंद करण्यात आला होता. पालिकेनं काल वर्तमान वर्षाचे बारा लाख आणि मागील रक्कमेवरील व्याज मिळून २५ लाख रूपयांचा धनादेश लातूरच्या पाटबंधारे विभागाकडे मुख्याधिकारी डॉक्टर उत्कर्ष गुट्टे यांनी देताच शहराचा पाणी पुरवठा पूर्ववत करण्यात आला.

**कृती आराखडा**

येत्या पावसाळ्यात नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी मान्सूनपूर्व कामं मे अखेरपर्यंत पूर्ण करण्याच्या तसंच पुरामुळे बाधित होणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कृती आराखडा तयार ठेवण्याच्या सूचना कोल्हापुरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी दिल्या. ते काल मान्सूनपूर्व कामांच्या आढावा बैठकीत बोलत होते.

**हवामान मुंबई आयएमडी**

राज्यात बहुतांश ठिकाणी तापमानानं चाळिशी पार केली आहे. राज्यात काल सर्वाधिक ४१ पूर्णांक ५ अंश सेल्सियस तापमान अकोला इथं नोंदवलं गेलं. वाशिम इथं ४१ पूर्णांक चार, मालेगाव ४१ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. जळगाव, बुलडाणा, वर्धा, सोलापूर, आदी शहरातही पारा चाळीस अंशाच्या वर पोहोचला आहे. नाशिक शहरातही काल यंदाच्या हंगामातल्या 39 पूर्णांक4 अंश सेल्सिअस उच्चांकी तपमानाची नोंद झाली.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.